जा. क्र./का.अ./स्थावर/२०१३-१४/२८४ दिनांक :- १०-०४-२०१४

# पुणे विद्यापीठ, पुणे-७.

## संक्षिप्त निविदा सूचना

पुणे विद्यापीठाच्या आवारातील खालील कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर खात्यामधील शासकीय व निमशासकीय संस्थेतील नोंदणीकृत योग्य श्रेणीतील ठेकेदारांकडुन बी - १ नमुन्यात मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | कामाचा कालावधी | बयाणा रक्कम | को-या निविदासंचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲकेडेमीक पॅव्हेलीयन करिता सिमेंट कॉक्रीटचा पाया करणे. | ८,७०,०००/- | १ महीने | ९,०००/- | १,०००/- |

## अटी व शर्ती

१. को-या निविदा संचाची किंमत ( विना परतावा ) डिमांड ड्रॉफ्टने मा. कुलसचिव पुणे विद्यापीठ, पुणे - ७ यांचे नावाने भरावी लागेल.

२. को-या निविदेकरिता योग्य श्रेणीतील नोंदणीकृत ठेकेदारांनीच अर्ज करावेत. अर्जा सोबत नांदणीप्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ठेकेदारास कोरे संच देण्यात येतील.

३. ठेकेदाराने सन २०१३-२०१४ यावर्षातील कॉक्रीटचे M-20 किंवा त्यापेक्षा वरील ग्रेडचे १०० घन मीटर किंवा त्यापेक्षा जास्त परिमाणाचे काम पुर्ण केल्याचा, शासकीय/निमशासकीय अथवा नामांकित शैक्षणिक संस्थेकडील अनुभवाच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत असणे अनिवार्य आहे. तसा पुरावा सादर केल्यावरच कोरा निवीदा संच देण्यात येईल.

४. को-या निविदा संच मिळण्याची तारीख ११/०४/२०१४ ते १५/०४/२०१४ असेल. वरील मुदतीत अर्ज करणा-या ठेकेदारांना कार्यालयीन वेळेत निविदा संच मिळतील (सुट्टीचे दिवस वगळुन).

५. मोहोरबंद निविदा दि. १६/०४/२०१४ रोजी १५.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ०७ यांच्या कार्यालयात स्वीकारले जातील. उशिरा प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

६. प्राप्त झालेल्या मोहोरबंद निविदांपैकी लिफाफा क. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) ही दि. १६/०४/२०१४ रोजी दुपारी १६.०० वाजता उघडण्यात येईल (शक्य झाल्यास).

७. सविस्तर जाहिरातीमध्ये दिलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणा-या ठेकेदारांच्या निविदा लिफाफा क. २ वित्तीय निविदा (Financial Bid) दिनांक १६/०४/२०१४ रोजी दुपारी १७.०० वा. उघडण्यात येतील (शक्य झाल्यास).

८. लिफाफा क. १ मध्ये ठेकेदाराचे पत्र (सदर पत्रात सोबत जोडलेल्या कागदपत्रांची अनुकमांकासहीत यादी तसेच सर्व कागदपत्रांवर पृष्ठकमांक असणे गरजेचे आहे.) बयाणा रकमेचा धनाकर्ष, नोदणीप्रमाणत्र कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र इ. सोबत जोडणे आवश्यक आहे..

९. लिफाफा क. २ मध्ये पूर्णपणे भरलेली निविदा ठेकेदाराच्या स्वाक्षरीसह असणे अनिवार्य आहे.

१०. लिफाफा क. १ व २ हे लिफाफा क. ३ मध्ये भरुन तो मोहोरबंद करुन सादर करण्यात यावा.

११. प्रत्येक लिफाफ्यावर लिफाफा कमांक, कामाचे नाव, तांत्रिक/वित्तीय निविदा तसेच ठेकेदाराचे नाव असणे आवश्यक आहे.

१२. अटी व शर्ती तसेच इतर माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

१३. मोहोरबंद निविदेतील दराची ग्राहयता, त्या उघडल्यापासून १२० दिवसापर्यंत ग्राहय राहील.

१४. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा नाकारणे हे सर्व अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले आहेत.

१५. निविदासंच पोस्टाने दिले जाणार नाहीत.

कार्यकारी अभियंता
पुणे विद्यापीठ,पुणे-७.

१०.५.१५
मा. कुलसचिव
पुणे विद्यापीठ,पुणे-७.

प्रत माहितीसाठी :

३) स्थावर विभाग नोटीसबोर्ड.
४) प्रशासन विभाग नोटीसबोर्ड.
५) इंटरनेट प्रसिध्दीसाठी, सी.आय.एन.एस. विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ,पुणे -७.